# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : १०९७/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.प्रकाश गंगाराम जोशी,
श्रीदत्त निवास, विठ्ठल मंदिर जवळ,
मोगलवाडी-खोपोली, ता.खालापूर,
जि.रायगड ४१० २०३.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक गृह अलिबाग, पोलीस अधिक्षक रायगड यांचे कार्यालय, टिळक रोड, महर्षी कर्वे मार्ग, हिराकोट तलावाजवळ, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक गृह अलिबाग, पोलीस अधिक्षक रायगड यांचे कार्यालय, टिळक रोड, महर्षी कर्वे मार्ग,हिराकोट तलावाजवळ, ता.अलिबाग, जि.रायगड४०२ २०१.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १९/११/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ७/४/२०२२ | ---- | २९/४/२०२२ | २४/५/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२८/५/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १९/११/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.उत्तम रिकामे, पोलीस निरीक्षक कल्याण शाखा/ पोलीस उप अधीक्षक गृह (अतिरिक्त कार्यभार) उपस्थित व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.जगदीश काकडे, सेवानिवृत्त अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" एस.पी. रायगड यांच्या कार्यालयाच्या पत्र क्र. ४०३/अर्ज/जोशी/तक्रार/२०२०, दि.२४.०२.२०२० चे पत्र डी.जी.पी., महाराष्ट्र राज्य मुंबई कार्यालयास पाठविणेकरीता स्पेशल आय.जी., यांचे मार्फत कोकण भवन यांचे मार्फत सादर केले. त्यासोबतच्या जोडलेली कागदपत्रे छायांकित प्रती मिळणेबाबत"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२४/५/२०२२ रोजी, *" जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक गृह यांनी अपिलकर्ता यांना पोलीस महासंचालक महाराष्ट्र मुंबई यांचेकडील आदेश क्र.पोमसं/१५/६८/रायगड/४७/२०२१ दि.१/९/२०२१ यांचे आदेशाची प्रत १० दिवसात अपिलकर्ता यांना निशुल्क पुरवावी."* असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना माहिती देण्यात आलेली नाही. यासंबंधी खुलासा करताना जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, अपर पोलीस महासंचालक(आस्था) महाराष्ट्र राज्य मुंबई श्री.कुलवंत सारंगल यांचे आदेश क्र.पोमसं/१५/६८/रायगड/४७/२०२१ दि.१/९/२०२१ अन्वये असे निर्देश दिले आहेत की, अर्जदार श्री.प्रकाश जोशी यांच्या अर्जास अनुसरून पोलीस उपमहानिरीक्षक कोंकण परिक्षेत्र नवी मुंबई यांनी सादर दि.५/४/२०२१ केलेल्या अहवालाची छाननी केली असता अर्जदार श्री.प्रकाश गंगाराम जोशी, रा.खोपोली ता.खालापूर जि.रायगड यांनी स्वत: पोलीस खात्यामध्ये नोकरी केली आहे. त्यामुळे त्यांना कामकाजाचे ज्ञान असून ते त्या ज्ञानाचा दुरूपयोग करीत आहेत. ते विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, पोलीस उप अधीक्षक गृह, उप विभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, पोलीस कर्मचारी व मंत्रालयीन कर्मचारी यांचेविरूध्द एकाच विषयाचे तक्रारी अर्ज व त्याबाबत माहिती अर्ज वारंवार सादर करतात. त्यामुळे पोलीस खात्याचा व शासनाचा वेळ वाया

जात असल्याने सदरचे तक्रारी अर्ज व माहिती अर्ज यापुढे या कार्यालयाच्या स्तरावर दप्तरी दाखल करण्यात येतील. सदरच्या तक्रारी अर्जावर व माहिती अधिकार अर्जावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही असे सदर आदेशात अपर पोलीस महासंचालक(आस्था) महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी नमूद केले आहे.

यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, अपर पोलीस महासंचालक(आस्था) महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे हे आदेश असल्याने आपण तक्रारकर्ता यांना माहिती दिली नाही. आयोगाने आदेश दिल्यास ते तक्रारकर्ता यांना माहिती देतील.

अपर पोलीस महासंचालक(आस्था) महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे उपरोक्त नमूद दि.१/९/२०२१ रोजीच्या आदेशाचे अवलोकन करता दिसून येते की, या प्रकरणातील तक्रारकर्ता श्री.प्रकाश गंगाराम जोशी हे मोठया प्रमाणात तक्रार अर्ज अपर पोलीस महासंचालक यांचेकडे करीत असतात. त्याचप्रमाणे माहिती अर्ज देखील करीत असतात. त्यामुळे पोलीस खात्याचा व शासनाचा वेळ वाया जातो म्हणून श्री.प्रकाश जोशी यांनी केलेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही असे आदेश त्यांनी काढले आहे.

अपर पोलीस महासंचालक (आस्था) महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या या आदेशामध्ये दोन बाबी नमूद आहेत एकतर तक्रारकर्ता यांनी सादर केलेले तक्रारी अर्ज व दुसरे त्यांनी दिलेले माहिती अर्ज. तक्रारकर्ता यांनी केलेल्या तक्रारी अर्जावर प्रशासकीय दृष्टीकोनातून योग्य तो निर्णय घेण्यास अपर पोलीस महासंचालक सक्षम आहेत व त्यासंदर्भात त्यांना योग्य वाटेल असे आदेश पारित करू शकतात. तथापि माहिती अधिकारांतर्गत माहिती मागणारे जे माहिती अर्ज येतात, त्यावर जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय प्राधिकारी व राज्य माहिती आयोगाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे. माहिती अधिकारांतर्गत प्राप्त होणारे अर्ज नस्तीबध्द करण्याचे आदेश काढण्याचे अधिकार सार्वजनिक प्राधिकरणाच्या कोणत्याही स्तरावरील अधिकाऱ्याला नाही. तशी कोणतीही तरतूदी अपर पोलीस महासंचालक यांनी त्यांच्या आदेशात नमूद केलेली नाही. त्यामुळे श्री.प्रकाश गंगाराम जोशी यांचे माहिती अधिकारांतर्गत प्राप्त होणारे माहिती अर्ज नस्तीबध्द करण्यात येतील, असे अपर पोलीस महासंचालक(आस्था) महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी काढलेले आदेश कायद्या विरूध्द असल्याने त्याप्रमाणे कारवाई करणे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचेवर बंधनकारक नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारांतर्गत प्राप्त माहिती अर्ज/प्रथम अपीलावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार कारवाई करणे अपेक्षित आहे. याप्रकरणी तसे घडलेले दिसून येत नाही. तथापि विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेले विधान लक्षात घेता ते माहिती देण्यास तयार आहेत.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांना दि.७/४/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाची माहिती १५ दिवसात जलद टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर तक्रारकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १९ नोव्हेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
अपर पोलीस महासंचालक (आस्था),
पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
महाराष्ट्र पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग,
कुलाबा, मुंबई ४००००१